नि.फौ.ख. क्र. ११५/२०१८
<u>नि. क्र. ७६ लगत</u>

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२**
शपथेवर सत्य निवेदन करतो की,

**नाव** – **पिंटु उर्फ रघुनाथ वामन जाधव**
**वय** – ३७ वर्षे, **व्यवसाय**– शेती व वराह पालन,
**राहणार** – शिवशक्ती नगर, देगलूर रोड, उदगीर, ता.उदगीर, जि. लातूर.

**उर्वरित उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ श्री. एच. आर. शेख यांच्यामार्फत शपथेवर सुरू.**

**१०.** सुरेश वामन जाधव हा माझा भाऊ नाही. दिनांक २६/०२/२०१८ रोजी मोटार सायकलवरून भाजी मंडईकडे मी एकटाच जात होतो. कृष्णकांत चौकातून मनोज गॅस एजन्सीकडे मी जात होतो. मनोज गॅस एजन्सी जळकोट रोडवर आहे. लाल बहादुर शास्त्री शाळेपासून मनोज गॅस एजन्सीचे अंतर साधारण १५० फुट इतके आहे. मनोज गॅस एजन्सीपासून लाल बहादूर शास्त्री शाळा दिसते. हे म्हणणे खरे नाही की, मनोज गॅस एजन्सीपासून लाल बहादूर शास्त्री शाळा दिसत नाही. निडेबन येथील प्लॉटचा नमुना नं.८–अ चा उतारा मी दाखल करू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, संदिप सारोळे याने लॉन्चरने मारहाण केली, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, उमाकांत सारोळे याने कत्तीने मारहाण केली, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अशोक सारोळे याने काठीने मारहाण केली व शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली, हे मी खोटे सांगत आहे.

**११.** सदर मारहाणीची तक्रार मी शहर पोलीस ठाणे, उदगीर येथे दिली. पोलिसांनी माझा जबाब दिनांक २६/०२/२०१८ रोजी घेतला. लाल बहादूर शास्त्री शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर भांडण झाले. ते प्रवेशद्वार देगलूर रोडला लागून आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला, माझ्या भावाला व आईला आरोपींनी लोखंडी रॉड, कत्ती व काठीने मारहाण

केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेदिवशी आरोपी उदगीर येथे नव्हते.

**१२.** हे म्हणणे खरे आहे की, रमेश बाबुनाथ जाधव, रविकांत लक्ष्मण जाधव, सुनिल मारूती जाधव, उत्तम मारूती जाधव, भानुदास बाळु बळिंगे हे आमचे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दि.२६/०२/२०१८ रोजी मी, माझे भाऊ संतोष, प्रकाश व बालाजी टेम्पोत वराह भरत होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी सदर वराह आरोपीचे असल्याबाबत आरोपींनी आम्हाला सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपी व्यंकट सुरेश सारोळे यास आम्ही मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, सदर मारहाणीच्या अनुषंगाने व्यंकट सारोळे याने माझ्या व माझ्या नातेवाईकांच्या विरूद्ध पोलिसांकडे तक्रारी अर्ज दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, व्यंकट सारोळे याला आम्ही काठ्या, कत्ती व चाकूने मारहाण केली होती.

**१३.** हे म्हणणे खरे नाही की, वराह पकडत असताना व ते वराह टेम्पोत भरत असताना मला दुखापत झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीविरूद्ध मी खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझे व्यावसायिक प्रतिस्पर्धी असल्याने त्यांना त्रास देण्यासाठी मी त्यांच्याविरूद्ध खोटी फिर्याद दाखल केली आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by KRISHNADEO ANKUSH YADAV
Date: 2025.12.23 17:24:49 +0530

**( के. ए. यादव )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२) उदगीर

दिनांक :– २३/१२/२०२५